महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

परिपत्रक

परिपत्रक क्र.: का.क्र. ०१/मान्यता/२०२२/१०६३
दिनांक: २१.०७.२०२२

विषय: प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षांकरीता संलग्नता नुतनीकरणाची कार्यवाही पूर्ण करु न शकलेल्या मान्यताप्राप्त संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत...

संदर्भ:

१. मंडळाचे परिपत्रक क्र. का.क्र.०१/मान्यता/२०२२/८३०, दि.२०.०५.२०२२
२. मंडळाचे परिपत्रक क्र. का.क्र.०१/मान्यता/२०२२/१०५३, दि.१९.०७.२०२२

१. मंडळाच्या संदर्भीय परिपत्रक क्र.०१ अन्वये सन २०२२-२३ या प्रशिक्षण सत्रापासुन संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत सविस्तर कार्यपध्दती व वेळापत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

२. प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन ज्या संस्थांना मान्यता देण्यात आली आहे तथापि, काही कारणास्तव त्या संस्थांनी अद्याप मंडळाकडे अनामत रक्कम जमा केली नसल्याने त्यांना मंडळाव्दारे प्रवेशास मान्यता देण्यात आलेली नाही अशा संस्थांना मंडळाच्या संदर्भीय परिपत्रक क्र.०२ अन्वये प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत सविस्तर कार्यपध्दती व वेळापत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

३. जागतिक स्तरावरील कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रत्यक्ष प्रवेश कमी झाल्याने प्रवेश व उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांची संख्या हे निकष शिथिल करुन इतर निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांना प्रत्येकी एक असे एकुण २ वर्षाकरीता मंडळाव्दारे संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्यात आले आहे.

४. तथापि, तत्कालिन परिस्थितीत लागु करण्यात आलेली संचारबंदी व लॉकडाऊन या व अन्य कारणांमुळे काही संस्थांनी प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ साठी संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत कार्यवाही पूर्ण केली नसल्याने अशा संस्थांनी प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ मध्ये संस्था पुनच्छ: सुरू करण्यासाठी संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत मंडळाकडे विनंती केली आहे.

५. सदर संस्थांच्या विनंतीचा व तत्कालिन परिस्थितीचा विचार करून ज्या संस्थांनी प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ साठी संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत कार्यवाही पूर्ण केलेली नाही अशा सर्व संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या

संलग्नता नूतनीकरण मान्यता मिळण्यासाठी अर्ज करण्याची मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर कार्यपध्दती व कालमर्यादा खालील प्रमाणे असेल:

५.१. मंडळाने सद्यस्थितीत १ प्रशिक्षण वर्षाकरीता संलग्नता नूतनीकरण शुल्क निर्धारित केले आहे. सबब, प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या संलग्नता नूतनीकरणासाठी एकत्रित ३ वर्षांसाठी संलग्नता नूतनीकरण शुल्क अधिक प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ साठीचे बाकी असलेले संलग्नता नूतनीकरण शुल्क असे एकुण ५ वर्षांचे संलग्नता नूतनीकरण शुल्क मंडळाचे खालील बँक खात्यात जमा करण्यात यावे

**Account Holder Name: MSBSVET**
**Bank: HDFC BANK LTD**
**Branch: KALHER BHIWANDI**
**Account Number: 501 00 506 165 732**
**IFSC: HDFC0006198**

५.२. तथापि, संस्थेने प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ वा २०२१-२२ साठीचे संलग्नता नूतनीकरण शुल्क यापूर्वीच मंडळाच्या खात्यात जमा केले असल्यास त्यासंबंधी दस्तऐवज (चलन) सादर केल्यास त्या प्रशिक्षण वर्षासाठी संलग्नता नूतनीकरण शुल्क पुनच्छ जमा करण्याची आवश्यकता नाही.

५.३. मंडळाच्या उपरोक्त नमुद बँक खात्यात केवळ NEFT/ RTGS/ IMPS/ Internet Banking/ Online Payment Gateway च्या माध्यमातुनच संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात यावे. रोख अथवा चेक स्वरुपात संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात येवू नये व असे जमा केलेले संलग्नता नूतनीकरण शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५.४. संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करतांना Transaction Remark मध्ये <संस्था कोड>_Renewal नमुद करावा. उदा. ०२०४४ हा संस्था कोड असलेल्या संस्थेस संलग्नता नुतनीकरण शुल्क जमा करावयाचे असल्यास Transaction Remark मध्ये "०२०४४_ Renewal" असे नमुद करावे.

५.५. संस्थांनी संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे दि.२५.०७.२०२२ पर्यंत संलग्नता नूतनीकरणासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

५.६. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची काळजीपूर्वक छाननी करून संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात यावे. प्रत्यक्ष निरीक्षणासाठी शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच मंडळांतर्गत मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित अभ्यासक्रमातील तज्ञ निदेशक/ शिक्षक यांचा समावेश असलेली एक समिती नियुक्त करण्यात यावी.

५.७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्या द्वारे कोणत्याही कारणास्तव संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येण्यापूर्वी संबंधित संस्थेस संलग्नता नूतनीकरणाच्या अर्जातील त्रुटी, दस्तऐवजात मधील त्रुटी, प्रशिक्षण सुविधांमधील त्रुटी, इत्यादी दूर करण्यासाठी व संलग्नता नूतनीकरण शुल्क भरणे यासाठी मुदत

देण्यात यावी. तसेच, मुदत देऊन देखील त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या संस्थांची संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येणाऱ्या कारणांसहित संबंधित संस्थेस संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडून कळविण्यात यावे.

५.८. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांनी संबंधित प्रादेशिक कार्यालय यांच्यामार्फत मंडळाकडे शिफारशींसह प्रस्ताव दि.३०.०७.२०२२ पूर्वी सादर करावे.

५.९. मंडळाकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची समितीमार्फत छाननी करून तीन प्रशिक्षण वर्ष कालावधीसाठी संलग्नता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

५.१०. मंडळाकडे दि.३०.०७.२०२२ पर्यंत संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२२ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

५.११. तथापि, मंडळाकडे दि.३०.०७.२०२२ नंतर संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशींसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२३ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे ज्या संस्थांनी प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ साठी संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत कार्यवाही पूर्ण केलेली नाही अशा सर्व संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्यासंबंधी कार्यपध्दती व कालमर्यादेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

**प्रत: माहितीसाठी**

१. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था (सर्व)
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
५. निवडनस्ती